संक्षिप्त फौ.प्र.क्र.०९/२०२५

निशाणी क्र.६ लगत

<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१</u>

माझे नाव - सुधीर गंगाधर कर्चे,

वय - २९ वर्षे, व्यवसाय – पो.शि.ब.नं.२६८,

नेमुणक - दहिवडी, पोलीस ठाणे.

<u>सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. वाय. डी. इंगवले यांच्याव्दारे,</u>

दिनांक ०५/११/२०२४ रोजी दहिवडी पोलीस ठाण्यात मी पोलीस शिपाई या पदावर कार्यरत होतो. त्यादिवशी सहा. पोलीस फौजदार प्रकाश हांगे, पो.शि. चंदन शिवे, ब.नं. व मी असे मलवडी भागात पेट्रोलिंग करत असताना मा. सहा. पोलीस निरिक्षक सोनवणे यांचा सहा. पोलीस फौजदार प्रकाश हांगे यांच्या मोबाईलवर फोन आला व त्यांनी फोनवर सांगितले की, जयमल्हार हॉटेलच्या आडोशाला एक इसम सुरज महादेव खरात हा बेकायदा विनापरवाना चोरटी देशी दारूची विक्री करत आहे व तुम्ही सदर ठिकाणी जाऊन कारवाई करा असे सांगितले. त्यावर सहा. पोलीस फौजदार प्रकाश हांगे यांनी दोन पंचांना बोलावून त्यांना सदर बातमीचा आशय समजावून सांगितला व ते पंच म्हणून येण्यास तयार झाले. त्यानंतर आम्ही पोलीस स्टाफ व दोन पंच घटनास्थळी पायी चालत गेलो व सकाळी ११.०० वाजण्याच्या सुमारास छापा टाकला.

२. त्यावेळी तेथे एक इसम आमचा संशय आल्याने घाबरला. आम्हांला त्यांचा संशय आल्यमुळे आम्ही त्याला जागीच पकडले. त्याच्याकडे असणारा पांढ-या रंगाची पिशवीची पाहणी केली असता त्याममध्ये, देशी दारू सखु संत्रा टँगो प्रिमियम असे लेबल असलेल्या ९० मि.ली. च्या १७ सिलबंद प्लॅस्टिकच्या बाटल्या प्रत्येकी रूपये ३५/- किंमत असलेल्या मिळून आल्या. त्याला त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव सुरज महादेव खरात असे सांगितले. सहा. पोलीस फौजदार प्रकाश हांगे यांनी सदर मुद्देमालाचा दोन पंचासमक्ष पंचनामा करून मुद्देमाल जप्त केला व त्यावर पंच व पोलीस यांची सही करून सीलबंद केला. त्यानंतर पोलीस ठाण्यात जाऊन आरोपी सुरज महादेव खरात याचेविरूध्द महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ ई प्रमाणे फिर्याद दिली. आता मला

ती फिर्याद दाखविण्यात आली, त्यातील मजकूर बरोबर आहे, फिर्यादवर माझी सही आहे. फिर्यादीस **निशाणी क्र.०८** देण्यात येते. आता मला छापील प्रथम खबरी अहवाल दाखविण्यात आला, त्यातील मजकूर बरोबर आहे, त्यावर माझी सही आहे. छापील प्रथम खबरी अहवालास **निशाणी क्र.०९** देण्यात येते. जप्त मुद्देमालातील एक बाटली रासायनिक विश्लेषणाकरीता वेगळी काढून पंचासमक्ष सिलबंद केली. मी आरोपीला ओळखतो. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर नाही.

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. व्ही. बी. हिरवे यांचे मार्फत सुरु,**

३. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०५/११/२०२४ रोजी दहिवडी पोलीस ठाण्यात मी पोलीस शिपाई या पदावर कार्यरत असताना सदर दिवशी मी, सहा. पोलीस फौजदार प्रकाश हांगे व पो.शि. चंदन शिवे असे मलवडी भागात पेट्रोलिंग करत असताना मा. सहा. पोलीस निरिक्षक सोनवणे यांचा सहा. पोलीस फौजदार प्रकाश हांगे यांच्या मोबाईलवर फोन आला व त्यांनी फोनवर सांगितले की, जयमल्हार हॉटेलच्या आडोशाला एक इसम सुरज महादेव खरात हा बेकायदा विनापरवाना चोरटी देशी दारूची विक्री करत आहे व तुम्ही सदर ठिकाणी जाऊन कारवाई करण्यास सांगितले असे मी खोटे सांगत आहे.

४. हे म्हणणे खरे नाही की, सहा. पोलीस फौजदार प्रकाश हांगेनी दोन पंचांना बोलावून त्यांना सदर बातमीचा आशय समजावून सांगितला व ते पंच म्हणून येण्यास तयार झाल्यावर आम्ही पोलीस स्टाफ व दोन पंच घटनास्थळी पायी चालत गेलो व सकाळी ११.०० वाजण्याच्या सुमारास छापा टाकला याबाबत खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी तेथे एक इसम आमचा संशय आल्याने घाबरला, आम्हांला त्यांचा संशय आल्यमुळे आम्ही त्याला जागीच पकडून त्याच्याकडे असणारा पांढ-या रंगाची पिशवीची पाहणी केली असता त्यात देशी दारू सखु संत्रा टँगो प्रिमियम असे लेबल असलेल्या ९० मि.ली. च्या १७ सिलबंद प्लॅस्टिकच्या बाटल्या प्रत्येकी रूपये ३५/- किंमत असलेल्या मिळून आल्या व त्याला त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव सुरज महादेव खरात असे सांगितल्यावर सहा. पोलीस फौजदार प्रकाश हांगे यांनी सदर मुद्देमालाचा दोन

पंचासमक्ष पंचनामा करून मुद्देमाल जप्त केला व त्यावर पंच  व पोलीस यांची सही करून सीलबंद केला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर पोलीस ठाण्यात जाऊन आरोपी सुरज महादेव खरात याचेविरूध्द महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ ई प्रमाणे फिर्याद निशाणी ०८ प्रमाणे दिली. हे म्हणणे खरे नाही की, बेवारस माल आरोपीच्या नावे दाखवून खोटा खटला दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटा पंचनामा तयार केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी आरोपीविरुध्द खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

माझे समक्ष,

सही/-

(ए.वाय. शेख)

दि. २४/०७/२०२५

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दहिवडी.